आपण सकल भिडे कुलातील एकत्वाचा लावू दिवा ।
आपुलकीने करू वृद्धिंगत, सहकार्याचा पंथ नवा ।
एकमेका साह्य करूया, निर्मळ प्रीतीचे नाते सुंदर ।
संकोचाचे तोडू या बंध, एक राहू या अखंड निरंतर ।।

# नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान विषयी

भिडे कुलवृत्ताची संकल्पना प्रथम ग्वाल्हेर येथे राहणारे गोविंद कृष्ण भिडे यांच्या मनात आली आणि त्यांनी कामाला सुरुवात केली पण त्यांच्या निधना नंतर पुण्याला भिडे मंडळाची स्थापना होऊन या कामाला पुन्हा सुरुवात झाली. पण पुढे १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीमुळे या कामात खंड पडला. पुढे १९५० साली पुण्याला केसरीवाडा येथे भिडे कुलबंधूंची सभा होऊन कै. श्री. वासुदेव विद्याधर भिडे यांनी भिडे कुलवृत्ताची प्रथम आवृत्ती संपादनाची जबाबदारी स्वीकारली. त्यांना पुण्यातील कै. श्री. नरसिंह चिंतामण भिडे व कै. श्री. जनार्दन नरसिंह भिडे यांनी तसेच अनेक कुलबंधूंनी मदत केली.

११ जानेवारी १९५३ रोजी पुण्यातील टिळक स्मारक मंदिरात भिडे कुलवृत्ताची प्रथम आवृत्ती प्रख्यात साहित्यिक प्रा. श्री. म. माटे यांच्या हस्ते प्रकाशित झाली. त्या वेळेस माजी न्यायमूर्ती श्री. म. वि. भिडे हे अध्यक्षस्थनी होते. आपल्या भाषणात प्रा. श्री. म. माटे म्हणाले की, ''माझा भिडे कुलाशी असणारा संबंध आजोळकडून असून मी या समारंभाच्या निमित्ताने माझ्या आजोळीच आलो आहे.

१९५३ च्या पहिल्या आवृत्ती नंतर काम खंडित झाले. पहिल्या कुलवृत्ताव्यतिरिक्त इतर कोणतीही माहिती अथवा कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे 'नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान' ह्या नावांने न्यासाची स्थापना केली.

नोव्हेंबर १९९८ मध्ये प्रभादेवी मुंबई येथील सिद्धी विनायकाच्या मंदिरात भिडे मंडळींची एक सभा झाली. सभेला सुमारे २३ते २४ भिडे हजर होते. त्या सभेत नित्युंदन गोत्रीय भिडे मंडळींची एक स्वत:ची संस्था (न्यास) निर्माण करून त्या संस्थेचे नांव ''नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान'' असे निश्चित करण्यात आले. ह्या सभेतील उपस्थितांपैकी ११ जणांनी प्रत्येकी १००१/- रुपये देऊन एकूण रु. ११,०११/- रुपये इतका न्यास निधी जमा झाला. ह्या न्यासासाठी संस्थापक/विश्वस्त मंडळाची स्थापना करून ६ विश्वस्तांची निवड करण्यात आली आणि सर्वानुमते श्री. प्रदीप जगन्नाथ भिडे ह्यांची प्रतिष्ठानचे अध्यक्ष म्हणून निवड झाली.

भिडे कुलवृत्ताची दुसरी आवृत्ती अनेक अडचणींचा सामना करत, नऊ वर्षाच्या अथक प्रयत्नानंतर पूर्ण झाली. संपादक श्री. प्रभाकर भिडे, श्री. दामोदर भिडे आणि श्री. विनायक भिडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुण्याच्या विद्याकर भिडे व दिलीप भिडे आणि ठाण्याच्या चिंतामणी भिडे, अतुल भिडे, व्यंकटेश भिडे आणि रमेश भिडे या संपादक मंडळाच्या सदस्यांच्या प्रयत्नांनी हे शक्य झाले.

१३ जानेवारी २००८ रोजी पुण्यातील केसरी वाड्यातील लोकमान्य सभागृहात भिडे कुलवृत्ताची दुसरी आवृत्ती संत वाङ्मयाचे अभ्यासक स्वर्गीय प्रा. राम शेवाळकर यांच्या हस्ते प्रकाशित झाली. त्यावेळी अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. प्रदीप भिडे होते.

दुसऱ्या सुधारित कुलवृत्ताची प्रत आपल्यासमोर ठेऊन नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानच्या उद्दिष्टांपैकी एक मोठे आणि महत्त्वाचे उद्दिष्ट साध्य झाले आहे याचा आनंद आणि समाधान आपणा सर्वांना होत आहे. मात्र यापुढील उद्दिष्टपूर्तीची वाटचाल आणि यशस्विता याची जबाबदारी आपल्या सर्वांवर आहे. यासाठी भिडे कुलबंधूंपैकी अनुभवी, सार्वजनिक कामाची आवड व माहिती असणाऱ्या कुलबंधूंनी आणि विशेषत: तरूणवर्गाने पुढे यावे आणि प्रतिष्ठानची वरील उद्दिष्टे यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठीच्या कार्यात सहभाग घ्यावा.

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान गुणात्मक आणि संख्यात्मक दृष्टीने वाढावे यासाठी आर्थिक आणि अन्य सर्व प्रकारचे सहाय्य सर्व भिडे कुलबंधू कडून अपेक्षित आहे. कारण हे प्रतिष्ठान 'आपण आपल्यासाठी' निर्माण केलेले आहे आणि ते आपल्यासाठीच आहे हे सर्वांनी लक्षात ठेवायला हवे.

## भिडे कुलवृत्त प्रथम आवृत्तीतील निवडक . . .

चितेपासून झालेले म्हणून चित्पावन म्हणावे किंवा कोकणस्थांविषयी अभिमान व्यक्त करावयाचा तर 'ज्यांचे चित्त पावन म्हणजे पवित्र ते चित्पावन अशी व्युत्पत्ती लढविता येईल. वास्तविक हे दोन्ही प्रकारचें शब्दसाधन काल्पनिक आहे. पण चित्पावनांच्या गुणावगुणमिश्रणाचा नियम मात्र अनुभवसिद्ध होय.'

'गुणी गुणं वेत्ति' या वचनाप्रमाणे कोकणस्थ असणाऱ्या बाळाजी विश्वनाथांना मराठी राज्याच्या पंतप्रधानपदी नियुक्त केले. लेखणी व तलवार दोन्ही, कोकणस्थांनी गाजविली. आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत, चाफेकर, कान्हेरे, बापट, टिळक असे अनेक क्रांतिकारक कोकणस्थांत निर्माण झाले. प्रसंगी प्रवाहाविरुद्ध जाऊन क्रांतिकारी विचार मांडणारे व त्याप्रमाणे आचरण करणारे अनेकजण कोकणस्थच होते. गायीला उपयुक्त पशू मानणारे वि. दा. सावरकर, स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते महर्षी कर्वे, महात्मा फुले यांना आपल्या वाड्यात पहिली मुलींची शाळा काढू देण्याचे धैर्य दाखविणारे 'भिडे' हे सर्व कोकणस्थच. अत: भिड्यांचा इतिहास हा कोकणस्थांच्या किंवा चित्पावनांच्या इतिहासापेक्षा वेगळा असू शकत नाही.

**(प्रथम आवृत्तीचे संपादक - वासुदेव विद्याधर भिडे)**

## भिडे कुलवृत्त द्वितीय आवृत्तीतील निवडक . . .

'मी कोण ?' (कोऽहम्) हा प्रश्न प्रत्येक माणसाच्या आयुष्यात केव्हातरी पडतो. आपण जो काळ या जगामध्ये व्यतीत करतो त्यामध्ये प्रत्येक गोष्टीत 'याचा फायदा किंवा उपयोग काय?' असे प्रश्न विचारणे म्हणजे आपले आपल्यापुरतेच जगणे म्हणावे लागेल.

कुलवृत्त तयार करण्यासाठी बराच कालावधी लागला. त्यासाठी सातत्याने अनेक ज्येष्ठ व तरूण मंडळींनी आपल्या दैनंदिन कार्यालयीन कामाप्रमाणे येऊन हे काम पूर्ण केले. त्याकरिता प्रथम कार्यकारिणी व नंतर संपादक मंडळाने अथक प्रयत्न केले म्हणून हे किचकट व न संपणारे काम विशिष्ट टप्प्यापर्यंत होऊ शकले.

या कुलवृत्तामुळे बऱ्याच भिडे बांधवांना आपल्या सख्ख्या नात्यापलीकडील नातेमंडळी माहीत झाली, ती काय करतात ते कळले तर थोडीफार आपुलकी, आपलेपणा वाढण्यास मदत झाली तसेच गरजू भिडे मंडळींना, आर्थिक व इतर बाबतीत सुदृढ असलेल्या मंडळींनी थोडीफार मदत केली तर या कुलवृत्ताचा उद्देश सफल झाला असे वाटेल, कारण समाज एकत्र यावा, एकमेकांच्या उपयोगी पडावा, सर्वांनी प्रगतीचा प्रयत्न करावा ह्याच अपेक्षेने हे केले आहे.

हा पहिला टप्पा पूर्ण झाला असला तरी भिडे प्रतिष्ठानची बाकीची उद्दिष्टे साध्य व्हायची आहेत. मी विशेषत: तरुण मंडळींना आवाहन करतो की, त्यांनी पुढे येऊन भिडे प्रतिष्ठानचे काम करावे आणि भिडे कुलबंधूंची सर्वांगीण प्रगती साधण्यासाठी प्रयत्न करावेत.

१९५३ साली प्रकाशित झालेल्या कुलवृत्तामध्ये मागील दहा ते चौदा पिढ्यांचा मागोवा घेतलेला आपणाला दिसेल. त्यानंतर गेल्या पन्नास/बावन्न वर्षात आणखी तीन ते चार पिढ्यांच्या अस्तित्वाची मालिका आपण त्यांना जोडली आहे. गेल्या तीनशे/चारशे वर्षातील भिडे कुटुंबीयांच्या अस्तित्वाची मालिका कुलवृत्ताच्या माध्यमातून इतिहासाच्या रूपाने जिवंत ठेवण्याचा हा आपला प्रयत्न आहे. भिडे बंधूंच्या (विशेषत: कार्यकारिणी व संपादक मंडळाच्या) कार्यामागची मूलगामी आणि व्यापक तळमळ आपण समजून घेतल्याने हा प्रयत्न यशस्वी झाला, हे मी आनंदाने नमूद करतो.

**श्री. प्रदीप भिडे (अध्यक्ष)**

आपल्या भारतीय समाजाचा इतिहास 'शब्दबद्ध करणे' (Documentation) या संकल्पनेच्या बाबतीत समाजमनामध्ये बऱ्याचदा औदासीन्य आढळून येते. याचा उल्लेख या पूर्वीही इथे केला आहे. स्वत:ला विद्येच्या वारशाचा अभिमान बाळगणाऱ्या कोकणस्थ ब्राह्मणांना, त्यांच्या पाचशे वर्षापूर्वीच्या इतिहासाविषयी माहिती नसणे, हा औदासीन्याचाच परिणाम आहे. त्या दृष्टीने अशा कुलवृत्ताचे महत्व वादातीत आहे.

**डॉ. सतीश भिडे (आयु. ए. एस्)**

कुलवृत्त लिहिण्यामागे भिडे कुटुंबात आत्मीयता अधिक प्रमाणात निर्माण करावी हीच एक इच्छा आहे. एकमेकांविषयी माहिती व्हावी, परस्पर सहवास व सहकार्य वाढावे की ज्यातून आपुलकी वृद्धिंगत व्हावी.

**श्री. प्रभाकर भिडे (द्वितीय आवृत्ती संपादक)**

# भिडे आडनांव व व्युत्पत्ती

'भिडे' या नांवासंबंधी विचार करतां दोन तीन संभाव्य व्युत्पत्तींचा विचार करावा लागेल. तत्पूर्वी 'भिडे' हे तुमचे आडनांव पूर्वी भाडभोके होते असे इतर (भिड्यांव्यतिरिक्त) लोक अगदी ठामपणे सांगतात. तसे मात्र नाही. एका जुन्या हस्तलिखितांत ते अत्रि गोत्रियांत दाखविले आहे. मात्र या आडनांवांतील अशोभनीय, ग्राम्य अर्थ (संभाव्य असणारा वा सुप्त असणारा) विचारात घेताना भिड्यांचा उपमर्द करावा या उद्देशाने तशी कंडी पिकविली असावी. या वृत्तग्रंथासाठी प्रथमावृत्तीच्यावेळी व नंतर आतांही ज्या शेकडो भिडे कुटुंबियांनी वृत्त पाठविले त्यातील कोणीही 'पूर्वी ते आमचे आडनांव होते' असे लिहून पाठविले नाही व ते धारण करणारा एकही नित्युंदन गोत्रीय आमच्या पाहण्यात नाही.

आता 'भिडे' नांवाच्या दोन-तीन संभाव्य व्युत्पत्ती पाहू. एक -भिडस्त - संकोच करणारा, दोन -प्रतिपक्षीयांपर्यंत जाऊन भिडणारा, तीन - संघनेता. पहिली विचारात घेण्याचे कारण नाही, कारण एक तर तसे असते तर नांव 'भिडस्त' किंवा 'भिडस्ते' असे झाले असते आणि बऱ्याच जणांच्या एकूण स्वभावावरून भिडे हे 'निर्भीड' असतात असे दिसते. दुसऱ्या व तिसऱ्या व्युत्पत्तीत भेद नाही. प्रतिपक्षीयांपर्यंत जाऊन भिडणारा काय किंवा संघनेता काय एकच. आणि एक व्युत्पत्ती होऊ शकते ती म्हणजे खेळातील भागीदार तो 'भिडू'. भिडु, भिडा अशी रूपें होऊन त्याचे 'भिडे' असे आदरार्थी बहुवचनी रूप झाले. कोकणांत पूर्वी व आताही 'साने' ऐवजी 'साना', 'दाबके' ऐवजी 'दाबका' असें म्हणणारे वृद्ध आहेत. 'आ' ऐवजी 'ए' लागून हीं नावें बनली.

निवेंडीच्या 'रसाळ' भिडे वंशाच्या लोकांनी त्र्यंबक येथे दिलेल्या सर्व लेखात '. . . भिडे रसाळ गांव निवेंडी' असा स्वत:च्या नांवाच्या व गांवाचा निर्देश केला आहे. भिडे प्रथम, रसाळ नंतर, निवेंडी गांव सोडल्यावर काहींनी 'रसाळ' हे स्वतंत्र आडनांव घेतले व काहींनी 'भिडे' हे नांव तसेच ठेवले. म्हणजे सर्व नित्युंदन गोत्रीय रसाळ, भिडे होते किंवा आहेत, सर्व भिडे रसाळ नव्हते किंवा नाहीत. साताऱ्यात लोणार आळीत राहणारे एक कुटुंब 'लोणार' भिडे या नांवाने परिचित होते. त्या लोकांनी स्थलांतर केल्यावर ते विशेषण गळालें.

पुण्यात पुष्कळ भिडे कुटुंबे आहेत. त्यांना एकमेकापासून अलग करण्यासाठी, लोकांनी त्यांच्या नांवाआधी नवनवीन विशेषणे लावली आहेत. 'पानवाले', 'लाऊडस्पीकरवाले', 'शिकारी', 'सुधारक', 'वाईकर', 'अभिरुची भिडे', ही अशा प्रकारची विशेषणयुक्त नांवे आहेत. इतर आडनांवाच्या बाबतीतही कोणी 'वडेवाले', कोणी 'मोतीवाले', 'सराफ', 'रेडिओवाले', तर कोणी 'लोणीविके' अशी विशेषणें आहेत. काही वर्षांनी या विशेषणांची आडनांवे होणे संभवनीय आहे. अशा प्रकारच्या नामकरणाच्या आपत्तीतून मोठे मोठे रावबहादूर, रावसाहेब सुटले नाहीत, पुढारी सुटले नाहीत, फार काय 'भांग्या मारुती', 'जिलब्या मारुती', 'बटाट्यामारुती', 'बायक्या विष्णू', 'मढ्या विठोबा', खुन्या मुरलीधर' इत्यादी पुण्यातील देवही सुटले नाहीत. इतर गांवांतही 'ढोल्या गणपती', 'सुपारी हनुमान', 'काळा राम', 'गोरा राम', असे देव सुटले नाहीत; तेथे भिडे कसे सुटतील ?

# कुलदैवते आणि कुळाचार

भिडे कुलाचा सर्वसाधारण कुलस्वामी व्याडेश्वर आहे. (व्याडेश्वर शब्दांतील 'वाड' हा शब्द संस्कृतांतील व्याड शब्दाचा अपभ्रंश आहे.) व्याडेश्वर म्हणजे क्रूरांचा शास्ता म्हणजे शंकर. हा शंकर तामसी वृत्तीला साजेसा, शांत मनोवृत्तीचा किंवा स्मितमुखी नाहीं तर क्रूरांचा संहार केल्यावर येणाऱ्या विजयोन्मादांत तांडव नृत्य करणारा तांडवप्रिय शंकर आहे. व्याडेश्वर कुलस्वामी नसलेले भिडे जामसंडे वंशाच्या काहीं वंशावलीत आढळतात. त्यात व्याडेश्वराचे स्थान 'ब्रह्मन्' देवाने घेतलें आहे.. 'ब्रह्मन्' शब्दाचे जे अनेक अर्थ आहेत त्यातील एक अर्थ शंकर असा आहे. कोंकणांत खारेपाटणपाशीं कोर्ले गावांत असलेलें ब्रह्मन् देवाचे देवालय आहे तें शंकराचे आहे. तेव्हां ब्रह्मन्चा अर्थ शंकर असाच करणें योग्य आहे. म्हणजे दैवत तेंच, नांवात भेद आहे.

कुलस्वामी आल्यावर कुलस्वामिनी पाहिजे. ती योगेश्वरी वा जोगेश्वरी असून क्वचित् योगेश्वरी-जोगेश्वरी या जोड नांवानेहि ओळखली जाते. ही साधारणत: सर्व भिडे कुळांची कुलस्वामिनी आहे. जामसंडें वंशाच्या ज्या वंशावलींचा कुलस्वामी ब्रह्मन् देव आहे, त्यांची कुलस्वामिनी दुर्गा आहे. म्हणजे कुलस्वामिनी तीच, केवळ नांवात भिन्नता आहे. योगेश्वरी, दुर्गा, पार्वती एकच. यांत स्थल, काल व भावनापरत्वे इतरांची भर पडली आहे. स्थलांतर करुन नवीन गांवी गेल्यावर तेथील ग्रामदैवतें आली आहेत. दैवतें तींच पण नांवे भिन्न. त्र्यंबकेश्वर, आम्रायेश्वर इत्यादी ''ईश्वर' अंत्यपद असलेली सर्व नांवे शंकराची, महाकाली, अंबा, भवानी इत्यादीकांचाही समावेश झाला आहे. पुळें गांवाशी ज्यांचा संबंध आला अशा सर्व वंशावलीत गणपतीचा अंतर्भाव कुलदैवतांत झालेला दिसून येईल.

व्याडेश्वर गुहागरचाच किंवा जोगेश्वरी अंबें येथील (अंबेजोगाई) या कल्पना व भावना काहीं वंशावलींतून पूर्णतया गेल्या आहेत. पुण्यातींल एका भिडे वंशावलींतील कार्यारंभीच्या अक्षता चिमण्या गणपतीस जातात. सवाद्य मिरवणूक असली तरच कसबा गणपतीस जातात.

**परशुराम -** परशुरामाला भिडे कुलांच्या कुलदैवतांत स्थान नसलें तरी, इतर चित्पावनांच्या कुलांत त्याला जितके महत्व आहे, त्याहून भिडे कुलांत तें यत्किंचितही उणें नाही. विश्वामित्रांनी आरंभिलेले कार्य परशुरामाने तशाच धैर्याने व नेटानें पुढे चालविलें. परशुरामानें एकदां चौदा प्रेतांना उठविले. हे चौदा प्रेत पुरुष सोडवून स्वस्थ न बसतां परशुरामानें नरमेधासाठी आणल्या गेलेल्या सुलक्षणी बलिपुरुषांना वेळोवेळीं धैर्याने पुढे येऊन सोडविले. हे सत्कृत्य करतांना, क्षत्रिय प्राधान्य मान्य करुनहि नरमेधाचा पुरस्कार व आचार करणाऱ्यांचा तो प्रसंगविशेषीं संहारहि करी. यावरुनच त्यानें अनेक वेळा पृथिवी नि:'क्षत्रिय' केली. ही कथा रचिली गेली असावी. विश्वामित्रांचे कार्य धैर्याने आणि वेळ आल्यास शौर्याने पुढें चालवीत असता ज्यांना ज्यांना त्यांनी काळाच्या दाढेंतून ओढून काढले, त्या सर्वांनी त्यांचे अनुयायित्व स्वीकारावें ही गोष्ट ओघानेच येते. अशारीतीने समान संकटांत सापडलेले व त्यांतून मुक्त झालेले ते सर्वजण व पुढें त्यांचे वंशज, परशुरामाला, अतिशय थोर विभूति म्हणून देवासमान मानू लागले. त्या सर्वांचे तत्कालीन ध्येय एकच - नरमेधाचें उच्चाटन करणें हें होतें. असे एक ध्येय असलेल्यांची पुढे एक जाति झाली व तिचा आद्य पुरुष परशुराम झाला.

परशुराम जयंतीच्या दिवसाची, अक्षय्य तृतीयेची गणना साडेतीन मुहूर्तांपैकी, अर्ध्या मुहूर्तात होते.

**कुळाचार -**सर्वसाधारण आचार सर्व कुलांत आहेत. आधुनिक काळांत एकूणच लोकांची कार्यव्यस्तता, व्यवसायानिमित्त घराबाहेर जास्त काळ जाणें, जागेची उपलब्धता, पौरोहित्य करणाऱ्या गुरुजींची उपलब्धता व त्यांचेजवळ असणारा वेळ या सर्वांमुळे कुलाचारांत संकोच झालेला असला तरी ते पूर्णतया वर्ज्य झालेले नाहीत.

**गणेश चतुर्थी -** भाद्रपद शु. ४ या दिवशी श्रीगजाननाची मृण्मय मूर्ति घरीं आणून तिची प्राणप्रतिष्ठा करावयाची. नंतर दीड, पाच, सात वा दहा दिवस पूजाअर्चा करुन तिचे विसर्जन करावयाचे.

**गौरी -** गणेश चतुर्थीनंतर गौरी येतात व जातात. भिडे कुलात सर्वसाधारणपणे मुखवट्याच्या उभ्या गौरी नाहीत.

**नवरात्र -** शरन्नवरात्र बहुतेक सर्व कुलांत असतें. अखंड दीप बसतां उठता ब्राह्मण, सुवासिनी व क्वचित कुमारिका यांना भोजन व दक्षिणा प्रतिदिनीं एक वा दीड माळ किंवा फुलांचा गुच्छ देवीवर बांधणें. काही वंशावलीत सुवासिनीस भोजन नसतें तर काहींत कुमारिकेस नसतें. असे लहानलहान भेद असतात.

**महालक्ष्मी, घागरी फुंकणे -** अश्विन शु. अष्टमीला देवीचा तांदुळाच्या उकडीचा मुखवटा तयार करुन उभ्या

मूर्तीची स्थापना करुन मध्यरात्रीपर्यंत घागरी फुंकणे व जागरण करणें हे पाच वर्षांपर्यंत नवोढेने करावयाचें असतें. काहीं कुलांत महालक्ष्मी स्वगृही न पूजता परगृही पूजतात. काहीं कुलांत घरी केवळ एकच वर्ष व उरलेली चार वर्षे परगृही पूजतात. महालक्ष्मी ज्यांच्या घरी पूजावयाची तेथें जेवावयाचें असल्यास स्वत:च्या घरची शिधा नेण्याची प्रथा काही कुळांत आहे.

**मंगळागौरी -** नवविवाहितेने श्रावणांत प्रति मंगळवारी मंगलागौरीचे पूजन पाच वर्षे करावयाचें असतें.

**ओहर भरणें -** वधूवर - ओवर - ओहर. नवपरिणित वधुवरांनी खंडोबा, अंबाबाई, भवानी इत्यादींच्या दर्शनास एकत्र जाणें हा कुळाचार सार्वत्रिक नाही.

**दीपावली -** अश्विन वद्य द्वादशी, वसुबारस ते भाऊबीज पर्यंतचे येणारे अभ्यंगस्नानादि सोहळे व रुढी सार्वत्रिक आहेत.

**देवदीपावली -** मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा या दिवशी सर्व देव देवतांना विशेषत: कोकणस्थ देव देवतांना (आर्य व अनार्य) नैवैद्य दाखवितात. नैवैद्य विशिष्ट पद्धतीनें दाखवावयाचे असून त्यातील पक्वान्ने ठरलेली असतात. काही देवतांना वडे, काहींना घारगे व काहींना इतर पदार्थ अशी ही पक्वान्ने असतात. काही कुळांत एक, दोन वा अधिक नैवेद्य ठेवतात तर काही कुळांत दोन वा अधिक पाने असतात. काही वंशावलीत गांवापाशीं किंवा गांवांत असलेल्या नदींत किंवा लहान मोठ्या तळ्यांत दिवे सोडतात.

**खंडोबाचे नवरात्र -** मार्गशीर्ष शु. १ ते ६ (चंपाषष्ठी) तळी भरणें सार्वत्रिक नाही.

**मार्ग मळणें -** स्त्रियांच्या भाषेत ‘मारग मळणें.’ वर वर्णिलेला ओहर विवाहानंतर तीन वर्षांच्या अवधींत भरला गेला नाही तर हा विधी करावयाचा असतो. गांवाच्या सीमेबाहेर जाऊन तेथे पुरणा-वरणाचा स्वयंपाक करुन नूतन जोडपे, इष्ट मित्र, ब्राह्मण, सुवासिनी, इत्यादींनी एकत्र भोजन करावयाचें. या विधीस ‘मार्ग मळणे’ असे म्हणतात. या विधीचा निर्देश केवळ सबनीस भिडे कुटुंबियांच्या वृत्तामध्ये आला आहे.

**बोडण -** बोडण वंशवृद्धीनंतर भरतात. वंशवृद्धी तीन प्रकारें होतें. १) अपत्य जन्मानें; २) पुत्राच्या व्रतबंध संस्काराने; ३) पुत्राच्या विवाहानंतर.

बोडण हा शब्द ब्रह्मोदन किंवा बहुधन यांचा अपभ्रंश असावा. कै. वि. का. राजवाडे व कृ. पां. कुलकर्णी यांच्या मतें मोटन - वोडन - बोडण असा बनलेला असावा. विघ्नांचे मोटन - चूर्ण, मोडणे - ज्या आचाराने होतें, त्या आचाराचे नांव बोडण. किंवा ज्या आचारांत अन्नादि संभार मोडून त्याचे चूर्ण करावयाचे असते त्याला ‘बोडण’ असे नांव आहे. ‘वर्धन’ या शब्दवरुन ‘बोडण’ शब्द बनला असावा असें ना. गो. चापेकर म्हणतात.

नवोढा पतिगृहीं जातांना आपल्या समागमें अन्नपूर्णा देवी नेते. ही देवी मुलीवर येणारी संकटें निवारुन तिजवर सदैव कृपादृष्टि ठेवते, ही मूळाशी असलेली भावना. या मुलीची वंशवृद्धी झाली म्हणजे ते वृत्त देवीस अवश्य कळविले पाहिजे. त्या वृत्ताचे ‘बोधन’ करुन देण्याच्या विधीस ‘बोडण भरणे’ असें म्हणतात. हा विधि पूर्णतया स्त्री साम्राज्यातील आहे. जिला अपत्य लाभ झाला आहे, किंवा जिची वंशवृद्धि झाली आहे तिच्याच देवीला बहुधा बोडण भरतात. सुनेला अपत्य झाले असलें तरी सासूच्या देवीला बोडण भरलें तरी चालतें कारण त्यानें सासूचीही वंशवृद्धी झालेली असते. तसेंच सासूची देवी तीच सूनेचीही देवी असते. व्रतबंधानंतर वंशवृद्धि होत नसली तरी व्रंतबंधानें तो बटू ‘द्विज’ होतो म्हणजे दुसऱ्यांदा जन्मतो ही वृद्धीच !

वर दिलेल्या कारणांनी बोडण भरण्याचा विधि सर्व भिडे कुलांत आहे. काहीं थोड्या वंशावलींत वर्षांतून एका विशिष्ट दिवशी बोडण भरण्याची चाल आहे, व त्या दिवशीं काहीं कारणाने भरता न आल्यास दुसऱ्या एखाद्या दिवशीं भरतात. क्वचित नवसानें बोडण भरलें जातें, परंतु हे नवस क्षुल्लक प्रकारचे नसतात. घरांतील कोणी व्यक्ति जीवावरच्या आजारातून उठली तरच बोडण भरण्याचा नवस करतात. हा प्रकार विहित नसला तरी निषिद्ध मानता येईल असें नाही. कारण आजारी व्यक्तीचा एक प्रकारें पुनर्जन्मच झालेला असतो. तथापि स्थूलमानाने वंशवृद्धीनंतर बोडण भरावयाचें हेंच खरें.

**गोंधळ -** शुभकार्यानंतर थोडे अपवाद वगळून सर्व कुलांत आहे.

**जोगवा -** काहीं कुटुंबात ही चाल आहे. परंतु आतां लोप पावत चालली आहे.

**डोहाळेजेवण -** डोहाळतुलीला केलेलें जेवण. गरोदर स्त्रीच्या सातव्या महिन्यांत हे करतात. हे जेवण विविध पदार्थांचे असून ते डोहाळतुलीला विशिष्ट स्थली, विशिष्ट वेळीं, विशिष्ट प्रकारांनी, विशिष्ट वेशभूषा लेवून करतात. खाद्यपेय पदार्थांत पक्वान्ने, मिष्टान्ने, फळें, खिरी इत्यादी असतात. भोजन उद्यानांत, नदीकाठी, सौधावर, झोपाळ्यावर, समुद्रतीरावर, नौकेंत इत्यादी स्थली देतात. जेवणाची वेळ, पहाट, सकाळ, संध्याकाळ, काळोखी रात्र (तारका प्रकाश), चांदणी रात्र, कोवळें ऊन, समयांचा प्रकाश आणि विद्युतदीपांची सजावट अशा प्रकारे करतात. भोज्य पदार्थ पत्रावळी, केळीचे पान, चांदीचे पात्र किंवा अन्य प्रकारच्या पात्रात वाढलेले असतात. डोहाळतुलीला भिल्ल स्त्री, आदिवासी स्त्री, लक्ष्मी (कमळांतील), सरस्वती, क्षत्रिय कन्या, जिजामाता अशा विविध वेषांनी भूषवून त्या त्या वेशभूषेला साजेशी 'वाडी' भरतात. फुलें लेववितात. ही चाल बहुतेक सर्व कुलांत असून हा धार्मिक विधी म्हणून करीत नाहीत. काही कुळांत ही चाल वर्ज्य असली तरी इतरांनी केल्यास डोहाळेजेवणांस जाणें मात्र वर्ज्य नाही ! मुलीच्या सासरी चाल नसली तरी तिच्या माहेरी डोहाळेजेवणांस मात्र सासरच्यांना 'चालते'. डोहाळेजेवण स्वगृही वर्ज्य.

## "आम्ही भिडे" अनियतकालिक

**नवीन व ताज्या माहितीसाठी एखादे लिखित संपर्क माध्यम हवे अशी आवश्यकता वाटली, त्याचप्रमाणे भिडे कुलबंधु/भगिनी/माहेरवाशिणींना आपल्या विचारांची देवाण घेवाण करण्यासाठी एखादे व्यासपीठ उपलब्ध असावे या उद्देशाने 'आम्ही भिडे' या कुलवार्ता अनियतकालिकाचा पहिला अंक २००३ साली सांगली येथे झालेल्या भिडे कुलसंमेलनात प्रकाशित करण्यात आला. पहिला अंक प्रकाशित झाल्यावर अनेक प्रतिक्रिया आल्या, त्यापैकी अंकास मूल्य ठेवावे, अंक स्वत:च्या पायावर उभा राहील अशी कायम स्वरूपी व्यवस्था करावी, अशा सकारात्मक आणि उत्साहवर्धक प्रतिक्रीया मिळाल्या.**

**दुसरा अंक तळेगाव येथे २००५ मध्ये झालेल्या कुलसंमेलनात प्रकाशित केला आणि तिसरा अंक फेब्रुवारी २००९ मध्ये किहीम (अलिबाग) येथे झालेल्या संमेलनात प्रकाशित केला.**

**ज्या भिडे कुलबंधू/भगिनींना लिखाणाची आवड व क्षमता आहे. अथवा तरुणांसाठी नोकरी व्यवसायाची नवीन दालने, किंवा ज्येष्ठांना अध्यात्म किंवा योगाची आवड, भिडे कुलातील सभासद किंवा त्यांच्या मुलांना मिळालेल्या यशाबद्दलची दखल घेणे. इत्यादी बाबी गृहीत धरून अंकाचे आयोजन करण्यात आले.**

**वास्तविक 'आम्ही भिडे' हे नियतकालिक व्हावे असा प्रयत्न आहे परंतू त्यासाठी भिडे सभासदांचा सहभाग व सहकार्य अपेक्षित आहे. तसेच एकूण सुमारे १२०० ते १४०० अंकांची छपाई, या अंकांचे वितरण यासाठी येणारा खर्च येणारा खर्च, सद्य परिस्थितीत आर्थिक दृष्ट्या प्रतिष्ठानला पेलविणे कठिण आहे. तरी सुद्धा प्रत्येक भिडे कुल संमेलनात 'आम्ही भिडे' चा अंक प्रकाशित व्हावा असे प्रतिष्ठानला वाटते. अर्थात या परिस्थितीत बदल होऊन प्रतिष्ठान आर्थिकदृष्ट्या सुदृढ झाल्यास वर्षातून चार वेळा हा अंक प्रकाशित करण्याचा मानस आहे. त्यासाठी भिडे कुलातील प्रत्येकाचे सहकार्य व मदतीची आवश्यकता आहे.**

नोंदणी क्रमांक : (ई) – २०१४० मुंबई वेबसाईट : www.bhidekul.in

# नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान, मुंबई

**नोंदणीकृत कार्यालय** : १, सुरेश विठ्ठल व्हिला, १२वा रस्ता, खार (प.) मुंबई – ४०० ०५२. दूरध्वनी : २६०५२६६४/६५

**ठाणे कार्यालय** : शिवानंद पार्क (तळ मजला),
सुळे पार्क, टाइम्स् ऑफ इंडिया बिल्डिंग,
महात्मा गांधी रस्ता नौपाडा ठाणे (प.) ४००६०२
संपर्क : ९८३३५८७४०१,९८२११६०६७५.

**पुणे कार्यालय** : ९२, शुक्रवार पेठ,
रंजन को.ऑप. हौ. सोसायटी, बुरूड आळी,
मंडई गणपतीचे मागे, पुणे – ४११ ००२
संपर्क : ९६५७५४१२३६, ९८२२०२४८४९,

## आवाहन

जानेवारी २००८ मध्ये भिडे कुलवृत्ताची दुसरी आवृत्ती प्रकाशित करून भिडे प्रतिष्ठानच्या अनेक उद्दिष्टांपैकी एक महत्त्वाचे उद्दिष्ट आपण पूर्ण केले. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी बराच वेळ व पैसाही खर्च झाला. प्रतिष्ठानच्या प्रारंभापासून देणग्या, सभासदत्त्व आणि कुलवृत्त प्रतिंची आगाऊ नोंदणी ह्या माध्यमातून भिडे कुलबंधू/भगिनी/माहेरवाशिणींकडून आर्थिक मदत आली, परंतू विद्यार्थी गुणगौरव आणि विशेष पारितोषिकांसाठी मिळालेला संचित निधी याव्यतिरिक्त प्रतिष्ठानकडे जास्त रक्कम शिल्लक राहू शकलेली नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे कुलवृत्तामध्ये अधीक माहिती मिळावी यासाठी ८ ते ९ वर्षे थांबावे लागले. त्याचप्रमाणे, कुलवृत्त प्रतिची किंमत सर्वसाधारण लोकांना परवडावी या दृष्टिकोनातून सुरुवातीला कुलवृत्त नोंदणी किंमत रु. ५००/- ठेवण्यात आली आणि प्रकाशनाच्यावेळची किंमत रु. ६००/- इतकीच ठेवण्यात आली. वास्तविक छपाईचे वेळेस खर्चात वाढ होऊन त्याची विक्री किंमत ९०० ते १००० रुपये इतकी ठेवण्यापर्यंत खर्च आला आहे. तरीसुद्धा आपण नोंदणी मूल्यामध्ये वृद्धी न करता ६०० रु. इतकीच किंमत ठेवलेली आहे. कुलवृत्ताच्या एकूण ८०० प्रति छापून घेतल्या. त्या पैकी सुमारे ४५० इतक्या प्रतींची नोंदणी झालेली होती आणि १०० ते १२५ प्रतींची विक्री झाली. परंतु आजपावेतो आपल्याकडे सुमारे २०० पेक्षा जास्त प्रति शिल्लक आहेत. एक प्रत रु. ६००/- प्रमाणे आपले जवळ जवळ रु. १,२५,०००/- इतकी रक्कम कुलवृत्त प्रतींमध्ये अडकलेली आहे. खरं तर प्रतींच्या छपाई खर्चासाठी ५ ते ६ लाख रुपये खर्च अपेक्षित असतांना ७ लाखाचे वर रक्कम छपाई साठी खर्च झालेली आहे. म्हणजे ‘‘ना नफा ना तोटा’’ या तत्वाच्या पलीकडे जाऊन आपणास हा खर्च आलेला आहे.

प्रतिष्ठानचे सभासदत्व देतानासुद्धा फक्त रु. १००/- एकाच वेळेस (One Time) इतकेच शुल्क आकारण्यात आले, एवढेच नाही तर कुलवृत्तामध्ये जास्तीतजास्त माहितीचे संकलन व्हावे म्हणून सभासद वर्गणीची सक्ती न करता सभासदांशी वेळोवेळी प्रत्यक्ष संवाद, पत्रव्यवहार करून माहिती संकलित केली आणि जिद्दीने/कष्टाने कुलवृत्त प्रकाशित करण्याचे उद्दिष्ट पूर्ण केले. आता कुलबंधूंनी प्रतिष्ठानचे आजीव सदस्यत्व (रु.१०००/-) घेऊन नव्या कुलवृत्ताची प्रत घेऊन त्यायोगे प्रतिष्ठानचे आर्थिक बळ वाढविण्यासाठी यत्न करावेत.

वार्षिक स्नेहसंमेलन, ‘आम्ही भिडे’ कुलवार्ता प्रकाशन, विद्यार्थी गुणगौरव, ज्येष्ठ कुलबंधू व भगिनींचा सत्कार, टपाल खर्च, जागा भाडे, दूरध्वनी, स्टेशनरी, सर्वसाधारण सभा इत्यादी आवश्यक खर्च पाहता आणि भिडे प्रतिष्ठानचे काम अखंडपणे चालू राहण्यासाठी भिडे कुल बंधू/ भगिनी/माहेरवाशिणींकडून आर्थिक पाठबळ मिळणे अत्यंत गरजेचे झालेले आहे.

१९५३ सालच्या पहिल्या आवृत्ती नंतर भिडे कुलाचे काम खंडित झाले. त्यामुळे पुढील कुलवृत्तामध्ये माहिती संकलित करण्यास सुद्धा खूप कष्ट घ्यावे लागले. सद्य परिस्थितीत मात्र दुसरी आवृत्ती प्रकाशित झाल्यानंतर न थांबता प्रतिष्ठानची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी आपण कार्यरत झालेलो आहोत. प्रकाशनानंतर सुमारे एक वर्षाने **आपण www.bhidekul.in या नावाने भिडे वेबसाइट निर्मिती करून दुसरे उद्दिष्ट पूर्ण केले.** या भिडे वेबसाइट निर्मिती नंतर होतकरू, हुषार शालेय/महाविद्यालयीन/उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत करणे, व्यावसायिक भिड्यांची यादी तयार करून त्याचा उपयोग तरूण वर्गास नोकरी, व्यवसायासाठी मार्गदर्शन, ज्येष्ठ वर्गासाठी वैद्यकीय दृष्ट्या आर्थिक आणि शारिरिक शक्य ती मदत करणे, ‘आम्ही भिडे’ कुलवार्ताचे नियमित किंवा तिमाही प्रकाशन, वेबसाइट द्वारे परदेशात किंवा भारतात वास्तव्यास असलेल्यांना मदतीची देवाण-घेवाण करणे, भिडे वधू-वरांसाठी माहिती संकलन, रक्तगट सूची आणि भिड्यांची स्वत:ची वास्तू निर्माण करणे इ. उद्दिष्टे डोळ्यापुढे आहेत व त्यापैकी बरीचशी वेबसाईटच्या माध्यमातून पूर्ण करता येतील.

उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी किंवा हे कार्य अखंडपणे सुरू राहण्यासाठी कुलवृत्ताच्या माध्यमातून अनेक भिडे कुटुंबीय एकत्र आलेले आहेत. कोणतीही संस्था अथवा घर कितीही नैतिकतेच्या आधारावर सुरू असले तरी सुद्धा आर्थिक पाठबळाशिवाय चालत नाही. हे कार्य पुढे नेण्यासाठी पुणे व ठाणे कार्यालयाचे भाडे, संगणक, दूरध्वनी, इंटरनेटद्वारा वेबसाइटच्या माध्यमातून प्रत्यक्ष संवाद साधण्यासाठी येणारा खर्च, वीज बिल, टपाल खर्च, कुलवार्ताचे नियमित प्रकाशन या सर्व बाबींसाठी वर्षाकाठी कमीतकमी सुमारे २ लाख रुपये इतका खर्च येणार आहे. दरमहा येणाऱ्या नियमित खर्चासाठी किंवा स्नेहसंमेलन, विद्यार्थी वर्गास करण्यात येणाऱ्या

मदतीत वृद्धी करणे, प्रकाशन इ. या खर्चासाठी **२५ लाख रुपये संचित निधी जमा करून त्याच्या व्याजातून** उद्दिष्टे पूर्ण करण्याचा संकल्प नुकत्याच किहीम येथे झालेल्या संमेलनात केलेला आहे. म्हणून कुटुंबातील प्रत्येकाने आपला वाढदिवस, इच्छापूर्ती किंवा दिवंगत पूर्वजांचे स्मरण या सर्वांच्या माध्यमातून भिडे कुलबंधू/भगिनी, माहेरवाशिणींनी कमीतकमी रु. १०००/- **याशिवाय आपल्या भिडे कुटुंबातील आर्थिकदृष्ट्या सबळ असलेल्या, उच्चपदस्थ, व्यावसायिक, भारतातील अथवा परदेशातील भिडे कुटुंबीयांनी किमान २५ ते ५० हजार किंवा त्यापेक्षा अधिक प्रत्येकी देऊन भिडे प्रतिष्ठानची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी मदतीचा हात पुढे करावा.**

नुकत्याच झालेल्या किहीम येथील संमेलनामध्ये या आवाहनानुसार **भिडे असोसिएटस्चे श्री. माधवराव चिं. भिडे यांनी रु. १,००,०००/- योजक असोसिएट्स्चे नाना भिडे यांनी रु. ५१,०००/- आणि भिडे प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष श्री. शशिकुमार भिडे यांनी त्यांच्या कुटुंबातर्फे रु. १,००,०००/- तसेच प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक आणि भिडे प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष श्री. चंद्रकांत भिडे यांनी रु. १,००,०००/- संचित निधी साठी जमा केलेले आहेत. परदेशस्थ** भिडे बांधवांनी यासाठी भरघोस मदत करावी असे आवाहन करीत आहोत.

आजमितीस लोप पावत असलेली एकत्र कुटुंब पद्धती, कुटुंबाचा संकुचित आकार म्हणून भिडे कुटुंबीय प्रतिष्ठानच्या माध्यमातून एकत्र जोडण्याची जबाबदारी आपल्या प्रत्येकावर आहे. आपण सर्वजण भिड्यांचे, भिड्यांसाठी व भिड्यांनी चालविलेल्या प्रतिष्ठानसाठी शक्य तेवढा वेळ व आर्थिक मदतीचा हात पुढे करून प्रतिष्ठानचे हात बळकट करावेत ही विनंती !

**श्री. प्रदीप भिडे**
अध्यक्ष

| | | |
|---|---|---|
| **श्री. चंद्रकांत भिडे,** ठाणे. | **श्री. माधव चिं भिडे** (मुंबई) | **श्री. शशिकुमार भिडे,** पुणे |
| कार्याध्यक्ष | उपाध्यक्ष | कार्याध्यक्ष |
| **श्री. मुकुंद भिडे** (वसई) | **श्री. शिवप्रसाद भिडे** (मुंबई) | **श्री. विश्वास भिडे** (पनवेल) |

**आणि**
**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानचे सर्व कार्यकारिणी सदस्य.**

**आर्थिक मदतीसाठी धनादेश किंवा डिमांड ड्राफ्ट पुणे/ मुंबई येथील बँकेवर 'नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान' या नावानेच खालील पैकी कोणत्याही पत्त्यावर पाठवावेत.**

**दामोदर केशव भिडे**
७, वृंदावन सोसायटी, टिळक नगर,
डोंबिवली (पूर्व) जि. ठाणे.
फोन : ९८३३५८७४०१

**दिलीप वासुदेव भिडे**
१३८८, शुक्रवार पेठ.मौर्य रेसिडेन्सी,
नवा विष्णु मंदिराजवळ पुणे - ४११ ००२
फोन - ९६५७५४१२३६

**चिंतामणी जनार्दन भिडे**
बिल्डिंग नं. ६६ बी. फ्लॅट क्र. ३,
वृंदावन सोसायटी, माजीवडा -
ठाणे (प) ४००६०१ फोन : ९८२११६०६७५

**माधव पुरुषोत्तम भिडे**
स. नं. ११९/४, सरिता नगरी (क्र. १)
एफ/११, फ्लॅट क्र.१४, गणेश मळा,
पुणे - ४११ ०३० फोन - ९८८११२७२८०

**कुमार विष्णू भिडे**
भिडे यंत्र लोह वस्तू केंद्र, सांगली,
७३०, गणपती पेठ, सांगली.
फोन - ९८२२०८५३८२

**विद्याकर वासुदेव भिडे**
१११९, सदाशिव पेठ,
निंबाळकर तालीम चौक
पुणे - ४११ ०३० फोन -०२०-२४४८५०६१

**देणगी देणाऱ्यांना आयकरात सवलत मिळण्यासाठी ८० - जी कलमाखाली तरतूद करण्यात आलेली आहे.**
**आयकर सवलत क्रमांक DIT (E) / MC / 80G / 1217 / 2008/2008-09**
**वैधता दि. ३१-०३-२०११ पर्यंत**
**वेबसाइटवर जाहिरातीचा दर - नाममात्र रु. ५००/- ६ महिन्याकरिता असेल.**